प्रति,
मुख्याध्यापिका,
रामकृष्ण परमहंस म्यु. म. शाळा,
वांद्रे पूर्व
यांजकडून

विषय : शिक्षकांच्या प्रेरणादायी शिबिराविषयी

महोदय,

शुक्रवार दि. 29-08-2003 रोजी 11 ते 3 या वेळेत माझ्या शाळेत आपण शिक्षकांचे प्रेरणादायी शिबिर घेऊन मला शिक्षकांची व माझी मानसिकता बदलण्यासाठी फार फार उपकृत केले आहे.

आपल्या व्यक्तीमत्वाचा ( Personality) प्रभाव खूप काही सांगून गेला. आपली भाषाशैली, अविष्कार यामुळे वेळ कधी निघून गेली हे कळलेच नाही. शिक्षकांना गोष्टीद्वारे केलेले प्रबोधन, खेळातून दिलेली सामाजिक बांधिलकीची समजूत शिक्षक म्हणून स्वत:ला बदलण्याची प्रेरणा देऊन गेली. अध्ययन - अध्यापनाचे दर्जेदार कार्य, अंगी असावी अशी कौशल्ये, विद्यार्थी व शिक्षक यांचे संबंध याविषयीच्या कथाकथनाच्या शिकवणीने आमचे दोष दाखवून ते काढण्यास व चांगले गुण स्विकारण्यास आम्हास नक्कीच फार मदत होणार आहे.

आपण व आपणास सहकार्य करणाऱ्या श्रीम. विल्मा व श्रीम. लारा यांनीही त्यांच्या वर्तनाविष्काराने, घेतलेले खेळ, गोष्टीने आम्हाला जी मौलिक शिदोरी दिली आहे ती आम्ही शिक्षकपेशातील कर्तव्ये व जबाबदारी पार पाडतांना नक्कीच सदैव उपयोगात आणू.

माझे शिक्षक या शिबिराने खूपच आनंदले. त्यांना काहीतरी चांगले सापडल्याचा, मिळाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसला. शिवाय संध्याकाळी, रात्री व दुसऱ्या दिवशीही अशा शिबिराचा लाभ करून दिल्याबाबत माझे आभार मानण्यासाठी माझ्या घरी फोन येऊ लागले. श्री. विघ्नेश, विल्मा व लारा हीच तुमच्या यशाची पावती आहे.

आमच्या वसईच्या शिक्षकांनी तर चर्चच्या फादराना शिबिराचे वर्णन सांगून त्याचे वसईत आयोजन करण्याचेही निश्चित केले. मुंबई महानगरपालिकेतील मराठी विभाग क्र. 21 चे बीट ऑफिसर सन्मा. श्री. रविंद्र गावकर हे स्वत: काहीवेळ या शिबिरात सहभागी झाले व त्यांनी आपल्याबद्दल प्रशंसनीय उद्गार काढले. माझ्या शाळेच्या शेरेबुकात या कार्यक्रमाविषयी धन्यवाद दिले.

आपण सामाजिक जबाबदारी व समाजाची गरज ओळखून स्विकारलेल्या या कार्याला व कॅमिनो कंपनीला माझ्या लाख लाख शुभेच्छा !

आपण माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठीही असे शिबिर आयोजित केल्यास मी आपली ऋणी राहीन ! धन्यवाद !

जे. प. डिमेलो.
मुख्याध्यापिका
रामकृष्ण परमहंस मार्ग म.न.पा म्यु.म. शाळा
बांद्रा पू. मुंबई-५१.